RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ३, अंक २७]  शुक्रवार, मार्च १०, २०१७/फाल्गुन १९, शके १९३८  [पृष्ठे ९, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ४६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृह विभाग

२ रा मजला, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ मार्च २०१७

**अधिसूचना**

**मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३.**

क्रमांक एचआरसी. ०१०९/प्र.क्र.२२/पोल-१४.—मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३ (१९९४ चा १०) याच्या कलम २७ च्या पोट-कलम (२) चा खंड (ख) व पोट-कलम (३) आणि कलम ४१ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, शासन अधिसूचना, गृह विभाग, क्र. एचआरसी.०१०९/प्र.क्र. २२/पोल-१४, दिनांक २१ नोव्हेंबर २०१६ अधिक्रमित करून याद्वारे, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाच्या कार्यालयामधील निबंधक, सहायक निबंधक, संशोधन अधिकारी, कक्ष अधिकारी, अधीक्षक, लेखा अधिकारी, विधि सहायक, स्वीय सहायक, उच्चश्रेणी लघुलेखक, निम्नश्रेणी लघुलेखक, सहायक, ग्रंथपाल, लेखापाल, लिपिक-टंकलेखक व शिपाई या पदांच्या सेवाप्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ.**—या नियमांना, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग (सेवाप्रवेश व सर्वसाधारण सेवाशर्ती) नियम, २०१७ असे म्हणावे.

२. **व्याख्या.**—या नियमांत, संदर्भानुसार अन्य अर्थ अपेक्षित नसेल तर :—

(क) " अधिनियम " याचा अर्थ, मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३ (१९९४ चा १०) असा आहे ;

(ख) " नियुक्ती प्राधिकरण " याचा अर्थ, महाराष्ट्र मानवी हक्क आयोग, असा आहे ;

परंतु, व्यावसायिक अधिवक्ता म्हणून किमान पाच वर्षांचा अनुभव असणा-या उमेदवारांच्या बाबतीत, उच्च वयोमर्यादा पाच वर्षांपर्यंत शिथिल करता येईल, आणि

(ख) ज्याने विधि विषयातील पदवी व सामाजिक कार्यातील पदव्युत्तर पदवी धारण केली आहे, अशा उमेदवारांमधून अर्ज मागवून करण्यात येईल.

६. लेखा अधिकारी या पदावरील नियुक्ती, लेखा व कोषागार संचालनालयामधील लेखाधिकारी (गट ब) या संवर्गामधून प्रतिनियुक्तीद्वारे करण्यात येईल.

७. कार्यासन अधिकारी या पदावरील नियुक्ती, एकतर—

(क) शासनाच्या मंत्रालयीन विभागात कार्यरत असलेल्या कार्यासन अधिका-याच्या प्रतिनियुक्तीद्वारे ; किंवा

(ख) आयोगाच्या सेवेत कार्यरत असलेल्या व सहायक पदाचा किमान पाच वर्षे इतका, अनुभव असलेल्या व्यक्तींमधून, गुणवत्ता-नि-सेवाज्येष्ठतेच्या आधारावर पदोन्नतीने, करण्यात येईल.

८. अधीक्षक या पदावरील नियुक्ती, एकतर—

(क) शासनाच्या मंत्रालयीन विभागामध्ये कार्यरत असलेल्या कार्यासन अधिका-याच्या प्रतिनियुक्तीद्वारे ; किंवा

(ख) आयोगाच्या सेवेत सहायक पदावर कार्यरत असलेल्या व त्या पदाचा किमान पाच वर्षे इतका अनुभव असलेल्या व्यक्तींमधून, गुणवत्ता-नि-सेवाज्येष्ठतेच्या आधारावर, करण्यात येईल.

९. स्वीय सहायक या पदावरील नियुक्ती, एकतर—

(क) आयोगाच्या सेवेत उच्च श्रेणी लघुलेखक या पदावर कार्यरत असलेल्या व खंड (ग) मध्ये नमूद केलेला निकष पूर्ण करणा-या त्या पदावर किमान तीन वर्षांचा अनुभव असलेल्या उच्च श्रेणी लघुलेखकांमधून, गुणवत्ता-नि-सेवाज्येष्ठतेच्या आधारावर पदोन्नतीद्वारे ; किंवा

(ख) राज्य शासनाच्या सेवेत कार्यरत असलेल्या तीन वर्षांचा अनुभव असलेल्या उच्च श्रेणी लघुलेखकाच्या प्रतिनियुक्तीद्वारे ; किंवा

(ग) (एक) ज्यांचे वय १८ वर्षांपेक्षा कमी आणि ३८ वर्षांपेक्षा अधिक नाही : परंतु, आधीच शासनाच्या सेवेत असणा-या उमेदवारांच्या बाबतीत, उच्च वयोमर्यादा पाच वर्षांपर्यंत शिथिल करता येईल ;

(दोन) ज्याने पदवी धारण केली आहे ; आणि

(तीन) ज्याने मराठी लघुलेखनातील १२० शब्द प्र. मि. आणि मराठी टंकलेखनातील ४० शब्द प्र. मि. किंवा इंग्रजी लघुलेखनातील १२० शब्द प्र. मि. आणि इंग्रजी टंकलेखनातील ६० शब्द प्र. मि. एवढा वेग असलेले, शासकीय वाणिज्यिक प्रमाणपत्र धारण केले आहे, अशा उमेदवारांमधून अर्ज मागवून करण्यात येईल.

१०. उच्च श्रेणी लघुलेखक पदावरील नियुक्ती, एकतर—

(क) आयोगाच्या सेवेत निम्नश्रेणी लघुलेखक पदावर कार्यरत असलेल्या आणि खंड(ग) च्या पोटखंड (दोन) व (तीन) मध्ये नमूद केलेला निकष पूर्ण करणा-या त्या पदावर किमान तीन वर्षांचा अनुभव असलेल्या निम्न श्रेणी लघुलेखकांमधून गुणवत्ता नि सेवाज्येष्ठतेच्या आधारावर पदोन्नतीद्वारे ; किंवा

(ख) राज्य शासनाच्या सेवेत कार्यरत आलेल्या उच्चश्रेणी लघुलेखकाच्या प्रतिनियुक्तीद्वारे ; किंवा

(ग) (एक) ज्याचे वय १८ वर्षांपेक्षा कमी नाही आणि ३८ पेक्षा अधिक नाही : परंतु, आधीच शासनाच्या सेवेत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, उच्च वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत शिथिल करता येईल ;

(दोन) ज्याने पदवी धारण केली आहे.

(तीन) ज्याने मराठी लघुलेखनामधील १२० शब्द प्र. मि. वेग असलेले आणि मराठी टंकलेखनामधील ४० शब्द प्र. मि. वेग असलेले किंवा इंग्रजी लघुलेखनामधील १२० शब्द प्र. मि. वेग असलेले आणि इंग्रजी टंकलेखनामधील ६० शब्द प्र. मि. इतका वेग असलेले शासकीय वाणिज्यिक प्रमाणपत्र धारण केले आहे ; आणि

(चार) ज्याच्याकडे समकक्ष पदावरील किमान पाच वर्षांचा अनुभव आहे, अशा उमेदवारांमधून अर्ज मागवून करण्यात येईल.

परंतु, व्यावसायिक अधिवक्ता म्हणून किमान पाच वर्षांचा अनुभव असणा-या उमेदवारांच्या बाबतीत, उच्च वयोमर्यादा पाच वर्षांपर्यंत शिथिल करता येईल, आणि

(ख) ज्याने विधि विषयातील पदवी व सामाजिक कार्यातील पदव्युत्तर पदवी धारण केली आहे, अशा उमेदवारांमधून अर्ज मागवून करण्यात येईल.

६. लेखा अधिकारी या पदावरील नियुक्ती, लेखा व कोषागार संचालनालयामधील लेखाधिकारी (गट ब) या संवर्गामधून प्रतिनियुक्तीद्वारे करण्यात येईल.

७. कार्यासन अधिकारी या पदावरील नियुक्ती, एकतर–

(क) शासनाच्या मंत्रालयीन विभागात कार्यरत असलेल्या कार्यासन अधिका-याच्या प्रतिनियुक्तीद्वारे ; किंवा

(ख) आयोगाच्या सेवेत कार्यरत असलेल्या व सहायक पदाचा किमान पाच वर्षे इतका, अनुभव असलेल्या व्यक्तींमधून, गुणवत्ता-नि-सेवाज्येष्ठतेच्या आधारावर पदोन्नतीने, करण्यात येईल.

८. अधीक्षक या पदावरील नियुक्ती, एकतर–

(क) शासनाच्या मंत्रालयीन विभागामध्ये कार्यरत असलेल्या कार्यासन अधिका-याच्या प्रतिनियुक्तीद्वारे ; किंवा

(ख) आयोगाच्या सेवेत सहायक पदावर कार्यरत असलेल्या व त्या पदाचा किमान पाच वर्षे इतका अनुभव असलेल्या व्यक्तींमधून, गुणवत्ता-नि-सेवाज्येष्ठतेच्या आधारावर, करण्यात येईल.

९. स्वीय सहायक या पदावरील नियुक्ती, एकतर–

(क) आयोगाच्या सेवेत उच्च श्रेणी लघुलेखक या पदावर कार्यरत असलेल्या व खंड (ग) मध्ये नमूद केलेला निकष पूर्ण करणा-या त्या पदावर किमान तीन वर्षांचा अनुभव असलेल्या उच्च श्रेणी लघुलेखकांमधून, गुणवत्ता-नि-सेवाज्येष्ठतेच्या आधारावर पदोन्नतीद्वारे ; किंवा

(ख) राज्य शासनाच्या सेवेत कार्यरत असलेल्या तीन वर्षांचा अनुभव असलेल्या उच्च श्रेणी लघुलेखकाच्या प्रतिनियुक्तीद्वारे ; किंवा

(ग) (एक) ज्यांचे वय १८ वर्षांपेक्षा कमी आणि ३८ वर्षांपेक्षा अधिक नाही : परंतु, आधीच शासनाच्या सेवेत असणा-या उमेदवारांच्या बाबतीत, उच्च वयोमर्यादा पाच वर्षांपर्यंत शिथिल करता येईल ;

(दोन) ज्याने पदवी धारण केली आहे ; आणि

(तीन) ज्याने मराठी लघुलेखनातील १२० शब्द प्र. मि. आणि मराठी टंकलेखनातील ४० शब्द प्र. मि. किंवा इंग्रजी लघुलेखनातील १२० शब्द प्र. मि. आणि इंग्रजी टंकलेखनातील ६० शब्द प्र. मि. एवढा वेग असलेले, शासकीय वाणिज्यिक प्रमाणपत्र धारण केले आहे, अशा उमेदवारांमधून अर्ज मागवून करण्यात येईल.

१०. उच्च श्रेणी लघुलेखक पदावरील नियुक्ती, एकतर–

(क) आयोगाच्या सेवेत निम्नश्रेणी लघुलेखक पदावर कार्यरत असलेल्या आणि खंड(ग) च्या पोटखंड (दोन) व (तीन) मध्ये नमूद केलेला निकष पूर्ण करणा-या त्या पदावर किमान तीन वर्षांचा अनुभव असलेल्या निम्न श्रेणी लघुलेखकांमधून गुणवत्ता नि सेवाज्येष्ठतेच्या आधारावर पदोन्नतीद्वारे ; किंवा

(ख) राज्य शासनाच्या सेवेत कार्यरत आलेल्या उच्चश्रेणी लघुलेखकाच्या प्रतिनियुक्तीद्वारे ; किंवा

(ग) (एक) ज्याचे वय १८ वर्षांपेक्षा कमी नाही आणि ३८ पेक्षा अधिक नाही : परंतु, आधीच शासनाच्या सेवेत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, उच्च वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत शिथिल करता येईल ;

(दोन) ज्याने पदवी धारण केली आहे.

(तीन) ज्याने मराठी लघुलेखनामधील १२० शब्द प्र. मि. वेग असलेले आणि मराठी टंकलेखनामधील ४० शब्द प्र. मि. वेग असलेले किंवा इंग्रजी लघुलेखनामधील १२० शब्द प्र. मि. वेग असलेले आणि इंग्रजी टंकलेखनामधील ६० शब्द प्र. मि. इतका वेग असलेले शासकीय वाणिज्यिक प्रमाणपत्र धारण केले आहे ; आणि

(चार) ज्याच्याकडे समकक्ष पदावरील किमान पाच वर्षांचा अनुभव आहे, अशा उमेदवारांमधून अर्ज मागवून करण्यात येईल.

११. निम्नश्रेणी लघुलेखक पदावरील नियुक्ती,—

(क) राज्य शासनाच्या सेवेत कार्यरत असलेल्या निम्नश्रेणी लघुलेखकाच्या प्रतिनियुक्तीने ; किंवा

(ख) (एक) ज्याचे वय १८ वर्षांहून कमी नाही आणि ३८ वर्षांपेक्षा अधिक नाही : परंतु, आधीच शासनाच्या सेवेत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, उच्च वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत शिथिल करता येईल ;

(दोन) ज्याने पदवी धारण केली आहे ;

(तीन) ज्याने मराठी लघुलेखनामधील १०० शब्द प्र. मि. वेग असलेले आणि मराठी टंकलेखनामधील ४० शब्द प्र. मि. वेग असलेले किंवा इंग्रजी लघुलेखनामधील १०० शब्द प्र. मि. वेग असलेले आणि इंग्रजी टंकलेखनामधील ४० शब्द प्र. मि. वेग असलेले शासकीय वाणिज्यिक प्रमाणपत्र धारण केले आहे ; आणि

(चार) ज्याच्याकडे समकक्ष पदावरील किमान पाच वर्षांचा अनुभव आहे, अशा उमेदवारांमधून अर्ज मागवून करण्यात येईल.

१२. विधि सहायक पदावरील नियुक्ती, एकतर

(क) विधि सहायक म्हणून तीन वर्षांपेक्षा कमी अनुभव नसलेल्या शासनाच्या विधि व न्याय विभागात कार्यरत असलेल्या व्यक्तींमधून प्रतिनियुक्तीने ; किंवा

(ख) (एक) ज्याचे वय १८ वर्षांपेक्षा कमी नाही आणि ३८ वर्षांपेक्षा अधिक नाही : परंतु, आधीच शासनाच्या सेवेत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, उच्च वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत शिथिल करता येईल ;

(दोन) ज्याने, विधि विषयातील पदवी धारण केली आहे ; आणि

(तीन) ज्याने, अधिवक्ता म्हणून तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतका अनुभव धारण केला आहे, अशा उमेदवारांमधून, अर्ज मागवून कमाल पाच वर्षांपर्यंत आयोगाच्या विकल्पानुसार नूतनीकरण करण्यायोग्य असणा-या तीन वर्षांच्या कालावधीसाठी कंत्राटी तत्त्वावर करण्यात येईल.

१३. सहायक पदावरील नियुक्ती,—

(क) शासनाच्या कोणत्याही विभागात सहायक कार्यासन अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या व्यक्तीमधून प्रतिनियुक्तीद्वारे ; किंवा

(ख) आयोगाच्या अखंड सेवेत लिपिक-टंकलेखक या पदावर तीन वर्षांपेक्षा अधिक वर्षे कार्यरत असलेल्या लिपिक-टंकलेखकामधून गुणवत्ता-नि-सेवाज्येष्ठतेच्या आधारावर पदोन्नतीद्वारे करण्यात येईल.

१४. ग्रंथपाल पदावरील नियुक्ती,—

(क) शासनाच्या सेवेत ग्रंथपाल म्हणून कार्यरत असलेल्या व्यक्तींमधून प्रतिनियुक्तीने ; किंवा

(ख) (एक) ज्याचे वय १८ वर्षांपेक्षा कमी नाही आणि ३८ वर्षांपेक्षा अधिक नाही : परंतु, या आधीच शासनाच्या सेवेत असले[illegible] उमेदवारांच्या बाबतीत, उच्च वयोमर्यादा पाच वर्षांपर्यंत शिथिल करता येईल ;

(दोन) ज्याने ग्रंथालय शास्त्रामधील पदवी धारण केली आहे ; आणि

(तीन) ज्याच्याकडे पाच वर्षांचा अशा कामाचा अनुभव आहे, अशा उमेदवारांमधून अर्ज मागवून करण्यात येईल.

१५. लेखापाल पदावरील नियुक्ती, लेखा व कोषागार संचालनालयातील सहायक लेखाधिकारी यामधून प्रतिनियुक्ती तत्त्वावर करण्यात येईल.

१६. लिपिक-टंकलेखक पदावरील नियुक्ती, एकतर,-

(क) शासनाच्या सेवेत लिपिक-टंकलेखक म्हणून कार्यरत असलेल्या व्यक्तीमधून प्रतिनियुक्तीद्वारे ; किंवा

(ख) तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीपासून अखंड सेवेत असलेल्या आयोगाच्या सेवेतील शिपाई पद धारण करणा-या आणि माध्यमिक शाळा प्रमाणपत्र व ३० शब्द प्रती मिनिट टंकलेखन गती असल्याचे शासकीय वाणिज्यिक प्रमाणपत्र धारण करणा-या व्यक्तीमधून सेवाज्येष्ठतेच्या आधारावर पदोन्नतीद्वारे ; किंवा

(ग) (एक) ज्याचे वय अठरा वर्षांपेक्षा कमी नाही आणि अडतीस वर्षांपेक्षा अधिक नाही : परंतु, याआधीच शासनाच्या सेवेत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत ; उच्च वयोमर्यादा पाच वर्षांपर्यंत शिथिल करता येईल ; आणि

(दोन) ज्याने पदवी धारण केली आहे, अशा उमेदवारांमधून अर्ज मागवून करण्यात येईल.

१७. शिपाई पदावरील नियुक्ती, —

(एक) ज्याचे वय अठरा वर्षापेक्षा कमी नाही व अडतीस वर्षापेक्षा अधिक नाही : परंतु, या आधीच शासनाच्या सेवेत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, उच्च वयोमर्यादा पाच वर्षापर्यंत शिथिल करता येईल ; आणि

(दोन) ज्याने माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली आहे, हे पात्रतेचे निकष पूर्ण करणा-या उमेदवारांमधून अर्ज मागवून करण्यात येईल.

१८. मागासवर्ग उमेदवारांची वयोमर्यादा शिथिल करणे हे, शासनाच्या धोरणानुसार असेल.

१९. नियम ३,४,५,९,१०,११,१४ व १६ यामध्ये नमूद केलेल्या पदांवर नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती केलेल्या व्यक्तींना, ४ वर्षात ३ प्रयत्नामध्ये किंवा संबंधित पदांकरिता आयोगाकडून आणखी विहित करण्यात येईल अशा कालावधीत व प्रयत्नात, आयोगाने विहित केली असेल त्याप्रमाणे सेवा प्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक असेल. जर उमेदवार, विहित केलेली विभागीय परीक्षा विहित मुदतीत उत्तीर्ण होऊ शकला नसेल तर, अशा उमेदवारांची सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त केली जाण्यास पात्र असेल.

२०. नियम ३,४,५,९,१०,११,१४, व १६ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नियुक्ती केलेल्या व्यक्तींना, त्यांनी मराठी व हिन्दी भाषा परीक्षा आधीच उत्तीर्ण केली नसेल अथवा त्यांना त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यामधून सूट देण्यात आली नसेल तर, यासंबंधात केलेल्या नियमानुसार मराठी व हिन्दी भाषा परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक असेल.

२१. नियम ३,४,५,९,१०,११,१४ व १६ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती केलेल्या व्यक्तींसाठी परिविक्षा कालावधी दोन वर्षांचा असेल. परिविक्षा कालावधी कमाल एक वर्षापर्यंत वाढवता येईल. जर त्याने परिविक्षा कालावधी समाधानकारकरीत्या पूर्ण केला नसेल किंवा तो सदर पदासाठी योग्य नसल्याचे आढळून आले असेल तर, तदनंतर तो सेवेतून काढून टाकला जाण्यास पात्र असेल.

२२. नियम ३,४,५,९,१०,११,१२,१४ व १६ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नियुक्ती केलेल्या व्यक्तीला, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, महाराष्ट्र शासन याने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळण्याचे प्रमाणपत्र धारण करावे लागेल.

२३. आयोगाने निवृत्त शासकीय कर्मचा-यांमधून कंत्राटी तत्त्वावर केलेल्या सर्व नियुक्त्या ह्या नियत वित्तलब्धी किंवा वेतन वजा निवृत्तीवेतन यांनुसार असतील आणि आयोगाने ठरविल्याप्रमाणे विनिर्दिष्ट नियम व विनियम किंवा शर्ती, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १७ डिसेंबर २०१६ च्या तरतुदींनुसार असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**व्यं. मा. भट,**
शासनाचे उप सचिव.